दादर, पोर्तुगीज चर्च येथील चार्ल्स कोरिया यांच्या महानिर्वाणाच्या वेळी माझ्या मनात विचार आला, 'हे काम कसे झाले?' ही रचना पारंपरिक नाही. दादरच्या जल्लोषापासून काही मिनिटांवरच, भरपूर रहदारीच्या मध्ये ही जागा वसली आहे. मग इथे, अशी एवढी शांती कशी लाभू शकते? कशामुळे, ही तीन अंगणे, अंगणातल्या हिरवाईचा प्रकाश परावर्तित करून आत आणणारे बुटके दरवाजे की आत भिंतीवर अति सुंदर उजेड येऊ देणारी छपरातील तावदाने? की डोळे ज्या प्रतिक्षिप्त क्रियेने वर वळतात ती? प्रार्थनेच्या ठिकाणी कोणाला आणखी काय हवे असते? वर पाहणे, नजर उंचावणे?

लोक, सर्वाधिक प्रमाणात वास्तुविशारद, चार्ल्स कोरिया यांच्या कामाचा अभ्यास दीर्घकाल करत राहतील. त्यांच्या इमारती, त्यांची दूरदृष्टी, नागरी नियोजनाबाबतचे त्यांचे विचार यांबद्दल लिहीतील. आपण हे जग सोडून गेल्यावरही यातील काही बरेच शिल्लक असेल; एखाद्या माणसासाठी हा खूप मोठा वारसा आहे. परंतु याखेरीजही त्यांच्याजवळ आणखी काही होते, जे मला त्या दिवसापर्यंत निश्चित सांगता येत नव्हते. चार्ल्स बरोबर आपण काय गमावले? केवळ एक महान वास्तुविशारद, रचनाकार, नियोजनकर्ता, एखाद्या सौंदर्यपूर्ण जाणीवेची अचूक शब्दांत वकिली करणारा? हो, हे सारे तर आहेच. परंतु याहूनही अधिक काही होते, मला वाटते, आणि त्यामुळेच त्यांना गमावणे अतोनात असह्य झाले. चार्ल्सना जे आवडले असते त्याच्या हे अगदी उपरोधात आहेः त्यांच्याबरोबर आपण जे गमावले ते म्हणजे एक खरेखुरे कॅथलिक मन : विस्तारित, विलग (सर्वस्वी वेगळे), उत्तमाचीच निवड करणारे, विद्युतगती.

# अनावर ऊर्जेचा

— गौतम पटेल

# प्रज्ञावंत



http://gqcdn.gqindia.com/sites/default/files/charles-correa_1.jpg

मी त्यांना जन्मभर ओळखत होतो. अधिक अचूकपणे सांगायचे तर, माझ्या आयुष्यभर ते मला ओळखत होते. आमची कुटुंबे जवळजवळ साठ वर्षे एकमेकांच्या सान्निध्यात होती. माझे वडील, ते इंजिनिअर होते, आणि चार्ल्स बरोबर काम करायचे. प्रविण मेहतांबरोबर कांचनगंगावर त्यांनी केलेल्या कामाचा बोलबाला अधिक झाला आणि मग त्या तिघांनी नव्या मुंबईच्या योजनेवर सुरुवातीला काम केले. परंतु माझी त्यांच्याशी एक वेगळीच ओळख आहे, ती केवळ ते माझ्या बाबांचे व्यावसायिक सहकारी होते यापुरती मर्यादित नाही.

माझ्याजवळ चार्ल्सच्या काही विलक्षण आठवणी आहेत त्यातील ही विशेष आहे. त्यानुसार चार्ल्स एका छोट्या, कन्व्हर्टिबल (छप्पर सरकवता येणाऱ्या) गाडीत बसले आहेत, मला वाटतं ती हेराल्ड आहे, ती झपाट्याने वळणावरून जाते (वांद्रे ? चौपाटी ? तपशील मला आठवत नाही), बोटांत अर्धी जळलेली विडी (तीस छाप ?) धरलेला त्यांचा उजवा हात गाडीच्या बाहेर आहे. आजही ही आठवण तेवढीच पकड घेणारी आहेच परंतु पाठीमागे जाऊन, १९६०च्या दशकाच्या अखेरीला किंवा थोडे त्यानंतर, लहान मुलाच्या नजरेतून, याला एक भयंकर, अविचारी साहसाची भावना जोडलेली आहे. मुलांना आनंद देणारे केवढेतरी काही या माणसाकडे होतेः उदा. रेल्वेगाड्यांचे वेड (भुरळ पडण्यापलीकडचे होते ते). ही गोष्ट वेगवेगळ्या दिशांनी वेटोळे उलगडत जाणारी होती : रेषा, आकार, नियोजन, संपर्क, वाहतूक, रचना. त्यांचे मन तसेच होते : मूलतः सरळ रेषेतील नव्हे, चाकाची आस जशी वेगवेगळ्या दिशांना फिरते पण मध्यभागी एकत्र धरून ठेवलेली असते; तुम्हाला कधीच समजणार नाही, संभाषण कुठे सुरू झाले आणि कुठे संपणार आहे किंवा एखाद्या क्षणी पुढील आकर्षण काय असणार आहे : चे ग्वेवरा आणि ग्रेटा गार्बोची पोस्टर्स; चित्रपट, जॅझ. कित्येक वर्षे, सातत्याने ते फ्रान्सिस लाइचे Un Homme Et Une Femme मधील ध्वनिमुद्रण वाजवायचे आणि नंतर वुडी ॲलनच्या मॅनहॅटन मधील संगीत.

इतर कशाही पेक्षा त्यांना असामान्य बनविणारी एक गोष्ट होती, ती म्हणजे : इतर कोणाहीपेक्षा, जागांकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहून त्याला कौशल्याने हाताळणे त्यांना जमायचे. आकारांमधील मोकळ्याजागा त्यांना दिसायच्या. हे विचार करण्यासारखे आहे. ही एका अर्थी ‘दैवी दृष्टी’ आहे : मोकळ्याजागांकडे न्याहाळून पाहायचे, त्याचा हेतू समजून उमजून घ्यायचा, तो निश्चित करून त्याला झिलई द्यायची. वास्तुविशारद म्हणून प्रशिक्षित नसलेल्या आमच्यासारख्यांना कांचनगंगाचा आडवा छेद चक्रावून टाकतो. हे सारे कसे जुळवून आणले किंवा मोकळ्या जागा निर्माण करणारी चौकोनांची जुळणी करण्याची ही कल्पना कोणाच्या डोक्यात कशी येऊ शकते हे आम्हाला प्रथमदर्शनी कळतच नाही.

आणखी एक गोष्ट आहे : त्यांच्या रचना वेगळ्या होत्या पण त्या स्पष्ट करण्याची व्यवहारज्ञान, प्रज्ञा, इच्छाशक्ती आणि स्वभाव त्यांच्याजवळ होता.आपल्या सर्वांसाठी हा आणखी एक धडा आहे, लोटांगण घालायचे नाही किंवा कोणाचे मुखपत्रही बनायचे नाही पण आपले स्थान शर्थीने लढवायचे, आणि मला वाटते हे प्रत्येक पेशाला लागू असते वास्तुविशारदापासून ते वैद्यक आणि कायद्यापर्यंत. या देशातील कोणत्याही शहरावरचा दृष्टिक्षेप आपल्याला सांगेल की हा धडा आपण अजून शिकलेलो नाही.

त्यांच्या जीवाला शांतता नव्हती. त्यांचे मन त्यांना तसे करूच देत नव्हते. कल्पना आणि विचार दौडत असायचे, खूप वाचायचे होते, पाहायचे होते, काम करायचे होते आणि वेळ पुरेसा नव्हता. मूर्खपणा आणि सबबी यांसाठी त्यांच्याकडे सहनशक्ती नव्हती. नंतरच्या वर्षांत आम्ही कधी कायदा आणि न्याय यांबाबत बोलत असू. कायद्याच्या कचाट्याबाबतही ते सहनशील नव्हते. चार्ल्सबरोबरची संभाषणे म्हणजे संग्राम असत. निसर्गातील वावटळीसारखे ते तुम्हाला भिडत आणि तुमच्याकडे केवळ दोनच पर्याय उरतः माघार घ्या किंवा

तुम्ही पुरेसे शूर असाल किंवा विश्वास बसणार नाही एवढे मूर्ख (त्या दोघांमधील रेषा फारच पुसट आहे) तर त्यांना धारेवर धरा. असा प्रयत्न करणारे फारसे लोक मला माहीत नाहीत. आणि त्यात कोणी यशस्वी झाले असतील का याबद्दल मला शंका आहे. त्यांच्याकडे कल्पना असायची, बऱ्याच वेळा ती विचित्र असायची, पण त्यामागे एक कारणपरंपरा असायची. तुम्ही त्यांना सहजपणे टाळू शकायचा नाहीत. आपल्या कायद्यांविरुद्ध त्यांची तक्रार होती; मी कायद्यांचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. ''ते मूर्खपणाचे असतील आणि जुने झाले असतील आणि त्यांचा हेतू सफल होत नसेल तर तुम्ही त्यांचा त्याग का करत नाही?'' मला अजूनही उत्तर मिळालेले नाही.

त्यांना न्यायाची, न्यायाच्या रचनेची काळजी होती. आपण तेथवर कसे पोहोचायचे? न्याय्य म्हणजे काय? न्याय हे केवळ कायद्याचेच कार्यक्षेत्र आहे का? नियोजनातील त्यांच्या कार्याच्या मुळाशी हे होते असे मला वाटते आणि खरं तर सर्वच कामांच्या मुळाशी हा विचार होताः जुळ्या शहरांच्या संकल्पनेपासून ते गिरण्यांच्या जमिनीसाठीच्या योजनांपर्यंत. हा निव्वळ स्थावर मालमत्तेचा विकास नव्हता, ज्यामध्ये रचनेच्या सौंदर्यशास्त्रापलिकडल्या विचारात रुतलेल्या झगमगत्या गगनचुंबी इमारती आहेत, ज्यांची वास्तूरचना अर्थहीन आहे आणि कोणत्याही अर्थाखेरीज, हेतूखेरीज हे आकार उंची आणि दर्शनी भागावर थपडा मारून जातात. हे नियोजन सर्वांसाठी होते, श्रीमंत आणि गरीबही,सामाजिक अभियांत्रिकीच्या प्रकाराचा एक प्रयत्न, एका अशा गोष्टीचा ध्यास ज्याला मी आज न्याय आणि समानता म्हणू शकतो. 'सामान्य' ही संकल्पना जी आज न्यायमूर्ती आणि वकील यांना प्रिय झाली आहे ती त्यांनी कित्येक दशकांपूर्वी जाणून घेतली होती. तिच्यासाठी त्यांनी लढा दिला, लिहीत राहिले, बोलत राहिले, भाषणे देत राहिले, अगदी हमरीतुमरीवरही येत राहिले. नंतरच्या वर्षांत तर, पश्चिमाभिमुख काचेतून, अधिक चटई निर्देशांक, अधिक उंची, संकुचित मोकळी जागा यांसाठीच्या वाढत्या कर्कश आरोळ्यांमध्ये त्यांचा विवेकी आवाज एकाकी झाला. सामान्य लोक गेले खड्ड्यात.

नव्या मुंबईचा प्रयोग, तो फसला की कामी आला यापेक्षा दुसऱ्या एका कारणासाठी मला वाटते तो महत्त्वाचा होता. तो सुरू कसा झाला हे महत्त्वाचे : मार्ग प्रकाशन मध्ये जोडीने लिहिलेला एक लेख आणि नंतर शासनाने श्रद्धेने घेतलेली उडी. आजही शासनव्यवहारासाठी हा एक धडा आहे. हा धडा आपल्याला अशा एका शासनाविषयी सांगतो, ज्याच्याकडे कल्पनाशक्ती आहे, आपल्या संकुचित कक्षेच्या बाहेर जाऊन जे उत्तमाची कास धरते, दुसऱ्यांच्या कल्पनांचा आदर करून त्यांना धरून चालते, सर्वांच्या हितासाठी काम करते, समन्वयासाठी, न्यायासाठी. तेथे आणि इतरत्र, दोन्हीकडे नंतर आपल्याला जाणवले त्याप्रमाणे संकुचित व्यक्तिगत फायद्याचा विजय होऊ देणारे नाही. चार्ल्सना जे आवडले असते त्याच्या उपरोधात ते वास्तवात आले, या योजनेच्या कथेला तिचा असा एक आकार आहे : घंटेचा किंवा कमानीचा, स्वातंत्र्योत्तर भारतातील नियोजनाची एक महान गाथा म्हणून तिचा उदय झाला आणि निव्वळ स्थावर वास्तवात तिचा अंत.

चार्ल्स १९४७ साली १७ वर्षांचे होते. हा काळ मोठा आश्चर्यकारक आणि उत्साहाने भारलेला असणार. नंतरच्या पाच दहा वर्षांत ते आणि त्यांचे समकालीन एका स्वप्नाच्या उंबरठ्यावर उभे होते : भारत, त्यातील शहरे, त्यांचे भवितव्य, तेथील जनता या साऱ्यांचा अर्थ काय याविषयीचे ते स्वप्न. हे सारे मनोहारी दृष्य आपण संपूर्णपणे अयशस्वी कसे होऊ दिले?

त्यांच्या महानिर्वाणाच्या वेळी फादर रुडी हेरेडिया म्हणाले त्यांच्या मृत्यूचा आपण केवळ शोक करायचा नाही तर त्यांच्या जीवनाचा जल्लोष करायचा. खरेच आपण तसे केले पाहिजे. परंतु आपल्यापैकी कित्येकजण आज किंवा

उद्या किंवा परवा तसे करू शकत नाही. कालांतराने, कधी आपण हे सारे स्वीकारू शकू. त्यांच्या जाण्यामुळे आपण सारे व्यक्तिगत रीत्या दरिद्री झालो आहोत. परंतु त्यांनी ज्याला आपले घर म्हटले त्या मुंबई शहरापेक्षा अधिक नुकसान कोणाचेच झालेले नाही.

